# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया
## सरळ सेवा भरती -२०१४

जाहीरात क्रमांक -१/क्र.कली/जिकागो/आस्था-३/कावी- २१७/२०१४, दिनांक १७ मे, २०१४

## तलाठी व लिपीक - टंकलेखक पद भरती

**तलाठी व लिपीक - टंकलेखक** पदाकरीता खालील नमुद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडुन दिनांक **२ जून २०१४** रोजी **सायं.५.००** वाजेपर्यंत **(ONLINE)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. Online व्यतीरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाही.

जाहीरात व अर्जाचा नमुना **www.gondia.gov.in** व **www.gondiacollector.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्रं. | प्रवर्ग | पद संख्या | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त/ भुकंप ग्रस्त | खेळाडु | अपंग | समांतर आरक्षणा व्यतीरिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लिपीक - टंकलेखक** | | **वेतनश्रेणी :** (५२००-२०२००/- ग्रेड वेतन - १९००/-) | | | | | | | |
| १ | अनु. जाती | ५ | २ | - | - | - | - | - | ३ |
| २ | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ३ | भ.ज.(क) | १ | - | - | - | - | १ | - | - |
| ४ | भ.ज.(ड) | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ५ | इ.मा.व. | ३ | १ | - | - | - | - | - | २ |
| | एकुण | **११** | **३** | - | - | - | **१** | - | **७** |
| **तलाठी** | | **वेतनश्रेणी :** (५२००-२०२००/- ग्रेड वेतन - २४००/-) | | | | | | | |
| १ | अनु. जाती | २ | १ | १ | - | - | - | - | - |
| २ | इ.मा.व | २ | - | १ | १ | - | - | - | - |
| | एकुण | ४ | १ | २ | १ | - | - | - | - |

वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात अतिरिक्त संवर्गातील उमेदवार किंवा इतर कारणामुळे उमेदवार उपलब्ध झाल्यास बदल (कमी जास्त) होण्याची शक्यता आहे.

### 1) पात्रतेच्या अटी व शर्ती

**शैक्षणीक अर्हता**

**1.1)** **(अ) तलाठी पदाकरीता.**

I) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली अन्य अर्हता.

**(ब) लिपीक - टंकलेखक पदाकरीता**

I) माध्यमीक शालान्त परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.)किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण.

II) मराठी टंकलेखनाचा वेग 30 शब्द प्रती मिनीट /इंग्रजी टंकलेखनाचा वेग 40 शब्द प्रती मिनीट या गतीची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. .

**1.2)** निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर 2 वर्षाच्या आत विहीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल.संगणक अर्हता परीक्षा D.O.E.A.C.C.सोसायटीच्या अधिकृत C.C.S.किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर किंवा त्यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ ,मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासनमान्य संस्थेतून संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र दोन वर्षाचे आंत सादर करणे बंधनकारक राहील.

**1.3)** मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालावधीतील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र आवश्यक राहील. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बी.सी.सी.2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12.12.2011 नुसार मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून 6 महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर नियुक्ती दिली जाईल . सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करून जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील उमेदवाराशिवाय अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक 31 मार्च 2014 पर्यंतचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**1.4)** महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

**1.5)** उमेदवाराचे वय दिनांक 2 जून, 2014 रोजी किमान 18 वर्ष पुर्ण व कमाल 33 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांकरीता 5 वर्षापर्यंत शिथील, (माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन,खेळाडु स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य व 1991चे जनगणना कर्मचारी यांना शिथील असलेली उच्चतम वयोमर्यादा लागु राहील.)

**1.6)** निवड होणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागु राहील.

**अधिवास :-**

अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकां-याने दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील.(पुरावा आवश्यक)

**वयोमर्यादा :-**

1) शासन निर्णय दि.17ऑगस्ट 2004 मधील तरतुदीनुसार वरील पदासाठी उमेदवाराचे वय 2 जून, 2014 रोजी किमान 18 वर्ष व कमाल 33 वर्ष खुला प्रवर्गासाठी असावे.तसेच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल 38 वर्ष असावे.

2) शासन निर्णय 28.5.1992 नुसार माजी सैनिक यांना सशस्त्र दलात झालेली सेवा अधिक 3 वर्षे इतकी कमाल वयाची सवलत देण्यात येईल. (म्हणजेच त्यांच्या वयातून सैनिकी सेवेचा कालावधी कमी केल्यावर परिणामभूत वय हे विहित वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहून अधिक असू नसेल.)

3) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता 45 वर्षापर्यंत

4) अपंग व अपंग माजी सैनिक करीता वयोमर्यादा कमाल 45 वर्षे

5) विहित अहर्ता व वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.विहित वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांचे अर्ज स्वीकृत केले जाणार नाही.

6) अंशकालीन बाबत शासन निर्णय दि.27/10/2009 अन्वये वयोमर्यादा 46 राहील.

7) खेळाडू बाबत शासन निर्णय 30/4/2005 अन्वये वयोमर्यादा विहित वयोमर्यादेच्या 05 वर्षापर्यंत शिथिल राहील.

**2) परीक्षा शुल्क (फी)**

| पदाचे नांव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| तलाठी | रुपये 400/- | रुपये 200/- |
| लिपीक -टंकलेखक | रुपये 400/- | रुपये 200/- |

**माजी सैनिकांना आवेदन पत्र सादर करतांना शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

परीक्षा शुल्क **भारतीय स्टेट ऑफ इंडिया, मुख्य शाखा,गोंदिया** या बॅकेचे चलान व्दारे बॅकेत भरुन बॅकेचा Transaction ID प्राप्त करावा. बॅकेचे चालान भरल्याशिवाय उमेदवाराचा ऑनलाईन अर्ज स्विकृत होणार नाही याची नोंद घ्यावी. मुळे चालान प्रत स्वत:जवळ जपून ठेवावी.

**2.1)** सदर परीक्षा शुल्क **हे नापरतावा राहील.** कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**3) महिला उमेदवारांकरीता :-** खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती /कुटंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही . तसेच, मागासवर्गीय प्रर्वगातील इतर मागासवर्ग ,भ.ज. क, भ.ज. ड या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**4) माजी सैनिक उमेदवारांसाठी :-**माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदाकरीता आवेदन पत्र सादर करतांना माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा. माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवून शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास पात्र राहणार नाही. मात्र तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

**5) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरीता:-**अंशकालीन पदवीधर / पदवीकाधारक उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील अद्यावत नोंदणी केलेली असावी.

**6) प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांकरीता :-**प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिका-यांकडील प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**7) खेळाडु उमेदवारांकरीता :-**

अ) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-2002/प्र.क्रं.68/क्रीयुसे-2, दिनांक 30.4.2005 मधील अ.क्र.4(क) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत असलेल्या अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडु उमेदवारांनी त्याबाबतचे क्रिडा /खेळ विषयक प्रमाणपत्र धारक.

ब) प्रचलीत व मुख्य मान्यताप्राप्त खेळातील खेळाडुंना प्राधान्य देण्यात येईल.

**8) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य:-**

स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांना आरक्षण नसून नियुक्तीकरीता पसंतीक्रम आहे. त्यामुळे जाहीरातीनुसार अर्ज करतांना तसे अर्जात नमुद करुन नामनिर्देशित असावे.

**9) निवड पध्दती :-**

**i) तलाठी पदाकरीता** पदवी ही कमीत कमी अहर्ता असल्यामुळे परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**ii) लिपीक - टंकलेखक** या पदाच्या लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी 50 गुण घेवून एकुण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सामान्य ज्ञान यामध्ये जिल्ह्याचा भुगोल, हवामान इ. स्थानिक बाबींचाही समावेश राहील. परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमीक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. सदर परीक्षा इंग्रजी विषय वगळता अन्य विषयाची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

**iii)** लिपिक टंकलेखक व तलाठी पदाकरिता, शासन निर्णय क्रमांक प्रानिम-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 27/6/2008 मधील मुद्या 5 नुसार कार्यवाही करताना गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणाच्या किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**iv)** छाननी अंती पात्र/अपात्र झालेल्या अर्जाच्या अंतिमरित्या यादया जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचे नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. तसेच परीक्षेचे प्रवेशपत्र www.gondia.gov.in व www.gondia collector.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**v)** तलाठी व लिपीक-टंकलेखक पदाच्या लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

**vi)** लिपीक - टंकलेखक, लघुटंकलेखक या पदाकरीता **रविवार दिनांक 8.6.2014** रोजी आणि तलाठी पदाकरीता **रविवार दिनांक 22.06.2014** रोजी मुख्यालयी लेखी परीक्षा घेण्यात येईल. व त्यांनतर ओएमआर पध्दतीने उत्तरपत्रिकांची तपासणी करून निकाल संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**vii)** उमेदवारांनी उत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेनचा वापर करावयाचा आहे.

**10) अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सूचना :-**

10.1) उमेदवाराला कोणत्याही इंटरनेट कॅफे, गोंदिया जिल्ह्यातील / तहसिल कार्यालयातील सेतू केंद्रातून किंवा उपलब्ध असलेल्या कोणत्याही इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरुन अर्ज भरता येईल.(एक अर्ज एकाच पदाकरीता ग्राहय राहील.)

**अर्जदाराची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी विहित केलेला अर्ज www.gondia.gov.in व www.gondiacollector.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. अर्जात माहिती व स्वतःचा फोटो व स्वाक्षरी अपलोड करून सादर करावा व प्रिंट आऊट काढून घ्यावी. व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणीक्रमांक जपुन ठेवावा. उमेदवारांनी एक पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करावा.**

**10.2) लिपीक टंकलेखक** पदाच्या परीक्षा प्रवेशपत्र आपणास **www.gondia.gov.in** व **www.gondiacollector.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यास काही अडचण निर्माण झाल्यास लिपीक - टंकलेखक पदाकरीता **06.06.2014** रोजी जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयातील परीक्षा नियंत्रण कक्षातून प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येईल. लेखी परीक्षेकरीता कोणत्याही परीस्थितीत प्रवेशपत्राशिवाय परीक्षा केन्द्रात प्रवेश दिला जाणार नाही.

**10.3) तलाठी** पदाच्या लेखी परिक्षेकरीता परीक्षा प्रवेशपत्र उमेद्वारास **www.gondia.gov.in** व **www.gondiacollector.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यास काही अडचण निर्माण झाल्यास तलाठी पदाकरीता **दिनांक 20.06.2014** रोजी जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालयातील परीक्षा नियंत्रण कक्षातून प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येईल. लेखी परीक्षेकरीता कोणत्याही परीस्थितीत प्रवेशपत्राशिवाय परीक्षा केन्द्रात प्रवेश दिला जाणार नाही.

**10.4)** परीक्षा प्रवेश व इतर परीक्षेविषयी माहीती ही **www.gondia.gov.in व www.gondiacollector.in** वर उपलब्ध राहील.

**11) अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येत आहे. त्यामुळे उमेदवार परीक्षा पास झाल्यानंतर प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. केवळ परीक्षा पास झाल्यामुळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा.**

**12)** उत्तरपत्रिकेची तपासणी OMR पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्तरपत्रिकेतील निवडलेली पर्यायी वर्तुळ फक्त **काळया शाईच्या बॉल पेनने** संपूर्णपणे छायांकित करणे आवश्यक राहील.

**13)** गुणानुक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रांची तपासणीचे वेळी सादर करावयाचे दस्ताऐवज.

1) शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र
2) लिपीक - टंकलेखक पदास आवश्यक असलेले टंकलेखन प्रमाणपत्र
3) वयासंबधी दाखला (जन्माचा दाखला / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)
4) जातीचे प्रमाणपत्र
5) अधिवास प्रमाणपत्र
6) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (विमुक्त जाती व भटक्या जमाती / इतर मागासवर्ग करीता आवश्यक) सदर प्रमाणपत्र दिनांक 31 मार्च 2014 पर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अश्या उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.
7) शासकीय / निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र.
8) समांतर आरक्षणा अंर्तगत अर्ज केलेल्या उमेदवारांना वर नमुद करण्यात आलेला दाखला या व्यतिरिक्त समांतर आरक्षणाविषयीचे प्रमाणपत्र.
9) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्रं.प्र.अ.क्रं.1005/प्र.क्रं.36/05/-अ, दिनांक 26.5.2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे. **नमूना जोडलेला आहे.**
10) ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अर्जात नमूद केलेली माहीती खोटी आढळल्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांना अपात्र ठरविण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा उजर ऐकून घेतला जाणार नाही.

**14)** तलाठी व लिपीक - टंकलेखक पदाकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार नाही.

**15)** उमेदवारांना लेखी परीक्षेकरीता/मौखिक परीक्षेला/कागदपत्र पडताळणीच्या वेळी स्वतःच्या खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**16)** या प्रक्रियेत बदल करण्याचा परीक्षा स्थगीत / रद्य करण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीला राहील. वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य काही सूचना असल्यास त्याची माहीती सुचना फलकावर लावून www.gondia.gov.in व **www.gondiacollector.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

**17)** परीक्षा झाल्यानंतर प्रथम प्राथमिक निवडसुची संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीसबोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. प्राथमिक निवडसुची मध्ये नांव असलेल्या उमेदवारांची कागदपत्रे या कार्यालयाने तपासून घेतल्यानंतर आणि

तो त्यांनी अर्जात उल्लेख केल्यानूसार अचुक व विश्वासार्हय आढळून आल्यानंतरच उक्त उमेदवारांचे नांव अंतिम निवडसूचीमध्ये घेण्यात येईल.

**18)** उमेदवार जर प्रत्यक्षात एखादया कार्यालयीन आस्थापनेवर कार्यरत असल्यास योग्य मार्गाने ना-हरकत वजा अर्ज सादर केला पाहीजे.

**19)** निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराविषयी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**20)** निवड होऊन नियुक्ती झालेल्या उमेदवारांला शासननिर्णयानुसार लागू असलेल्या सर्व विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

**21)** विद्यमान भरती प्रक्रिया ही प्राप्त होणा-या सुधारीत शासननिर्णय न्यायालयीन आदेश यांच्या अधिनतेने राहील.

**22)** निवड झालेला उमेदवारांचा पोलीस विभागकडून चारित्र्य व पूर्वतिहास बोलविण्यात येईल. तो अनुकूल असल्याशिवाय संबंधित उमेदवार नियुक्तीस पात्र राहणार नाही.

दिनांक:- 17 मे, 2014
स्थळ :- गोंदिया

**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा जिल्हाधिकारी,गोंदिया.**

**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**गोंदिया**

## प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे शपथपुर्वक कथन करतो/करते की, अर्जात नमुद केलेली माहीती माझ्या माहीती नुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड / नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

मी याव्दारे शपथ पुर्वक कथन करतो/करते की, मला शासकीय सेवेकरीता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही माझ्या विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

ठिकाण :-
दिनांक :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**
**(नाव व पत्ता)**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ

## प्रतिज्ञापन

(नियम -४ पहा)

मी, श्री / श्रीमती /कुमारी ------------------------------------श्री-------------------- यांचा /याची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ------ वर्ष, राहणार -------------------------------- याव्दारे असे जाहीर करतो / करते की,

१) मी, ---------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे.
(असल्यास, जन्म दिनांक नमूद करावे.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे सदर पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-
दिनांक :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**